१८ जानेवारी २००३ पुढारी

# व्ही. टी. पाटील हे कोल्हापूरचे समाजभूषण : धारवाडे



*व्ही. टी. पाटील यांच्या आठव्या स्मृतिदिनानिमित्त शिक्षणमहर्षि विश्वनाथ तुकाराम पाटील या ग्रंथाचे प्रकाशन करताना माजी आमदार बाबुराव धारवाडे. छायाचित्रात डावीकडून सिंधुताई सपकाळ, प्राचार्य क्रांतीकुमार पाटील व रा. कृ. कणबरकर, रामराव बेनाडीकर आदी. (छाया : पप्पू अत्तार)*

कोल्हापूर : समाजजीवनात सतत समरस असणारे व्ही. टी. पाटील हे कोल्हापूरचे समाजभूषण होते असे मत माजी आमदार बाबुराव धारवाडे यांनी व्यक्त केले.

ताराराणी विद्यापीठाच्या वतीने आयोजित डॉ. व्ही. टी. पाटील यांच्या आठव्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमांत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी कुलगुरू रा. कृ. कणबरकर होते. यावेळी दिनकर द. पाटील लिखित 'शिक्षण महर्षि विश्वनाथ तुकाराम पाटील' या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले तसेच आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन प्रा. ए. एम. साळोखे व सुप्रिया मोहिते यांना गौरवण्यात आले.

यावेळी बोलताना धारवाडे म्हणाले की, व्ही. टी. पाटील यांच्या जीवनाचा प्रवास अत्यंत खडतरपणे झाला. स्वातंत्र्यपूर्व काळात त्यांनी इंग्रजांशी लढा दिला. कोल्हापुरातील विल्सनचा पुतळा पाडण्यात तसेच अनेक चळवळीत सहभाग घेतला. प्रत्येक व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व लक्षात घेऊन त्यानुसार ते आपल्या विचारांमध्ये बदल करत. त्यामुळेच राजकीय, सामाजिक, शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रांत त्यांनी आपला आगळावेगळा ठसा उमटवला असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

प्राचार्य क्रांतीकुमार पाटील म्हणाले की, व्ही. टी. पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त दरवर्षी आपण महाविद्यालयातील गुणी प्राध्यापक, शिक्षकांचा आदर्श पुरस्कार देऊन गौरव करतो. अशा शिक्षकांपासून इतरांनी प्रेरणा घ्यावी व गुणी शिक्षकांना प्रोत्साहित करणे हा त्यामागचा हेतू.

याप्रसंगी पुरस्कारप्राप्त शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात कणबरकर यांनी व्ही. टी. पाटील यांच्या कार्याचा आढावा घेतला. प्रास्ताविक जयश्री पाटील यांनी केले. सूत्रसंचालन अंजली साठे यांनी तर आभार तेजस्विनी मुडेकर यांनी मानले. या कार्यक्रमास सिंधुताई सपकाळ, रामराव बेनाडीकर, राजलक्ष्मी जाधव तसेच महाविद्यालयीन शिक्षक व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.